पोलीस स्टेशन रामनगर जिल्हा चंद्रपूर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): चंद्रपुर **P.S.**(ठाणे): राम नगर **Year** (वर्ष): 2021

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0534 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 28/05/2021 22:36 बजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 27/05/2021
**Date To** ( दिनांक पर्यंत): 28/05/2021
**Time From** (वेळेपासून): 11:00 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 17:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 28/05/2021 **Time** (वेळ): 22:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 073 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 28/05/2021 22:35 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): नगर रचना आणी मुल्य ,निर्धारण विभाग सहायक , संचालक नगर रचना शाखा ,कार्यालय चंद्रपूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दादा देवाजी सोनटक्के

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : देवाजी सोनटक्के

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1953 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.**(अ. | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| **S.No.(अ. क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गवराळा वार्ड शिवाजी नगर ,भद्रावती ,भद्रावती ,राम नगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गवराळा वार्ड शिवाजी नगर ,भद्रावती ,भद्रावती ,राम नगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** सेवानिवृत्त कर्मचारी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9892966438

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल श्रावण चहांदे | | वडील का नाम : श्रावण चहांदे | 1. c/o कावळे ,निर्माण नगर तुकुम चंद्रपूर , चंद्रपूर ,राम नगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये))** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 20 नोटा एकुण 10000रू | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 10,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No. (अ. क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.)** |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 28/05/2021 मी दादा देवाजी सोनटक्के वय 68 वर्ष, व्यवसाय- सेवानिवृत्त (युनियन कार्बाईड केमीकल कंपनी मुंबई) रा. गवराळा वार्ड, शिवाजी नगर, भद्रावती ता. भद्रावती जि. चंद्रपूर मी वरील पत्यावर राहत असून सन 1998 मध्ये युनियन कार्बाईड कंपनी मुंबई येथून सेवानिवृत्त झालेलो आहे. त्या अगोदर मी भारतीय सैन्यात सैनिक पदावर कार्यरत होतो. माझ्या नावाने भद्रावती तालुक्यात मौजा टाकळी येथे सव्र्हे नंबर 80/2/अ/2 आराजी 1.01 हे. आर. शेतजमीन आहे. सदर जागेवर मला पेट्रोलपंप टाकायचा असल्याने दोन वर्षापुर्वी मी तहसील कार्यालय भद्रावती येथून सदर जागा नियमाप्रमाणे अकृषक करून घेतलेली आहे. परंतु पेट्रोलपंप करीता मंजुरी न मिळाल्याने सदर जागेवर मोटेल आणि रेस्टरेट टाकायचे असल्याने मी तहसीलदार तहसील कार्यालय भद्रावती यांचेकडे परत लेखी अर्ज केला होता. त्यावर तहसीलदार तहसील कार्यालय भद्रावती यांनी मोटेल आणि रेस्टरेट असा आदेश दिला व सदर प्रकरण तहसीदार भद्रावती यांचेकडून नगर रचनाकार विभाग कार्यालय चंद्रपूर यांचेकडे सदर जमिनीवर मोटेल आणि रेस्टरेट बांधकामाचे परवानगी करीता ना हरकत करीता जात असल्याने सदर प्रकरण मी स्वत: मंजुरीकरीता तहसील कार्यालय भद्रावती येथून दिनांक 11/05/2021 रोजी नगर रचनाकार विभाग कार्यालय चंद्रपूर येथे दाखल केलेला आहे. दिनांक 24/05/2021 रोजी दुपारी 03 ते 04 वा. दरम्यान मी नगर रचनाकार विभाग कार्यालय चंद्रपूर येथे जावून सहा. नगर रचनाकार श्री. चहांदे यांना भेटलो आणि मोटेल आणि रेस्टरेट बांधकामाचे परवानगी करीता ना हरकत मंजुरीबाबत विचारणा केली असता त्यांनी मला सांगितले की, तुमचे काम मी करून ठेवतो परंतु सदर कामाकरीता तुम्हाला माझ्याकरीता 50,000/-रू दयावे लागेल तेव्हाच तुमचे काम होईल अन्यथा तुमचे काम होणार नाही असे म्हणाल्याने तेव्हा मी त्यांना नाईलाजास्तव होकार दिला तेव्हा त्यांनी सदर चे 50,000/- रू. दिनांक 27/05/2021 रोजी आणुन दया असे म्हणाले त्यावर मी त्यांना काही कमी करा असे म्हणालो असता त्यांनी ठिक आहे बघू या असे बोलले. त्यावरून मी त्यांना नाईलाजास्तव होकार देवून तेथून निघून आलो.परंतु श्री. चहांदे सहाय्यक नगर रचनाकार यांना 50,000/-रू. लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी आज दिनांक 27.05.2021 रोजी सकाळी 11.00 वाजताचे दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील श्री. भामरे सा. यांना भेटुन वरील हकीकत सांगुन मी वरील प्रमाणे लेखी तक्रार देत आहे. माझा श्री. चहांदे सहाय्यक नगर रचनाकार, कार्यालय नगर रचना विभाग चंद्रपूर जि. चंद्रपूर यांचेशी कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. तरी माझे तक्रारीवरुन माझ्या मौजा टाकळी येथे सर्व्हे नंबर 80/2/अ/2 आरजी 1.01 हे. आर. शेतजमीनवर मोटेल आणि रेस्टरेट बांधकामाचे परवानगी करीता ना हरकत देण्याचा कामाकरीता लाच मागणारे श्री. चहांदे सहाय्यक नगर रचनाकार, कार्यालय नगर रचना विभाग चंद्रपूर जि. चंद्रपूर यांचे विरुध्द कार्यवाही व्हावी. सदर कार्यवाही करीता लाच रक्कम म्हणुन आवश्यक असलेली रक्कम माझे बचतीतून जमा झालेले 50,000/- रू. आपणाकडे वापरण्याकरीता देत आहे तरी त्याचे विरूध्द कार्यवाही होणेस विंनती आहे याप्रमाणे माझी लेखी तक्रार आहे.यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.

भामरे साहेब यांनी 11:30 वा. दरम्याण त्यांचे कार्यालयात हजर असलेले पो.क रोशन चांदेकर यांना बोलावुन मा. शासकीय औद्योगीय प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर यांचे नावे पत्र देउन दोन पंच आनणेकरीता रवाना केले त्यांनतर अदांजे 12:35 वा दरम्याण पो.क. रोशन चांदेकर दोन पंचासह कार्यालयात परत आले व त्या पंचाना पोलीस उप अधिक्षक श्री. भामरे यांनी त्याचे नावे गाव विचारुन माझी त्याचेशी व स्टॉफची ओळख करुन दिली. त्यांनतर श्री. भामरे साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर मी व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्री.भामरे साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर श्री. भामरे साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन नापोक. अजय बागेसर यांनी व्हईस रेकर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर श्री. भामरे साहेब यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्री. भामरे साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 50,000/- (रू.500/- दराच्या 100 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रकमेस अँथ्रसिन पावडर लावली. त्यानंतर श्री. भामरे साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कार्यवाही करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरुन नापोक. अजय बागेसर यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकर्डर काळया धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मोटार सायकलने पंच क्र. 01 यांचेसह नगर रचना विभाग चंद्रपूर कार्यालय येथे पडताळणी करीता पाठविले असता पडताळणी दरम्यान चहांदे, सहाय्यक नगर रचनाकार, यांनी मला तडजोडीअंती रू. 10,000/- घेवुन उदया दिनांक 28/05/2021 रोजी त्यांचे नगर रचना विभाग चंद्रपूर कार्यालय येथे बोलाविले. लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आले. पोलीस उप अधिक्षक श्री. भामरे यांनी आम्हास विचारपुस करुन संभाषणाची रेकर्डेड फाईल ऐकली असता नमुद गै.अ. यांनी तंडजोडीअंती 10,000/-रु. लाच रक्कमेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. दुस-या दिवशी दिनांक 28/05/2021 रोजी लाच रक्कम घेवुन बोलाविल्याने पुढिल सापळा कार्यवाही दिनांक 28/05/2021 रोजी करण्याचे ठरविले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री. भामरे यांनी पंचनामा क्र. 2 मध्ये घेतल्या आहे.यांनतर अगोदर दिनांक 27/05/2021 रोजी ठरल्याप्रमाणे मी आज दिनांक 28/05/21 रोजी 14:00 वा. दरम्याण ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर आलो असता तिथे श्री. भामरे साहेब दोन्ही पंच व स्टॉफ सह कार्यालयात हजर होते. त्यानंतर श्री. भामरे साहेब यांनी काल दिनांक 27/05/2021 रोजी झालेल्या पडताळणी कार्यवाहि वरून गैरअर्जदार चहांदे, सहाय्यक नगर रचनाकार, चंद्रपूर यांचेविरूद्ध पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर गै.अ. यांनी तंडजोडअंती 10,000/रू ची मागणी केल्याने मला अँथ्रसिन पावडर लावलेली 50,000/- रू पैकी 10,000/-रू लाचेची रक्कम देण्यात आली. सदर 10,000/-रू. माझे शर्टच्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गैरअर्जदार चहांदे, सहाय्यक नगर रचनाकार, चंद्रपूर यांनी स्वत: किवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे गळ्यातून दुप्पटा काढुन डावे हातातच ठेवून इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणार्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.त्यानंतर श्री. भामरे, साहेब यांचे सुचनेवरुन नापोक अजय बागेसर यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकर्डर काळया धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मोटार सायकलने पंच क्र. 01 यांचेसह चंद्रपूर नगर रचना कार्यालयात जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 चंद्रपूर नगर रचना कार्यालयाकडे गेलो असता तिथे श्री. चहांदे हे हजर होते. परंतु त्याची मिंटींग चालु असल्याने त्यांनी मला लांबुनच थांबण्याचा र्इशारा केला. मिंटीग झाल्यावर त्यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी 10,000/-रु. लाचेची रक्कमेची मागणी केली. त्यावरून मी अँथ्रसिन पावडर लावलेल्या 10,000/-रु. रक्कम माझे शर्टच्या डाव्या खिश्यातुन काढुन श्री. चहांदे सहाय्यक नगर रचनाकार चंद्रपूर यांना दिल्या असता श्री. चहांदे सहाय्यक नगर रचनाकार चंद्रपूर यांनी लाच रक्कम 10,000/-रु. आपल्या उजव्या हाताने घेवुन मोजुन त्याचेकडे फुल पन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर मी बाहेर येवुन सापळा पथकास माझे गळयातील दुप्पटा डावे हाताने काढून डावे हातातच ठेवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री. चहांदे सहाय्यक नगर रचनाकार चंद्रपूर यांना रंगेहात पकडुन पुढील कारवार्इ केली.याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री. भामरे यांनी पंचनामा क्र. 3 मध्ये घेतल्या आहे.तरी अनिल श्रावण चहांदे, वय 50 वर्षे, सहाय्यक नगर रचनाकार, (वर्ग-2) नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, सहाय्यक संचालक, नगर रचना शाखा कार्यालय चंद्रपूर यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून माझे मौजा टाकळी येथे सव्र्हे नंबर 80/2/अ/2 आरजी 1.01 हे. आर. शेतजमीनवर मोटेल आणि रेस्टरेंट बांधकामाचे परवानगी करीता ना हरकत देण्याचा कामाकरीता तंडजोडीअंती 10,000/-रु. लाच रकमेची पंचासमक्ष मागणी करून माझेकडुन लाचेची रक्कम 10,000/-रु. स्वतः स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.सदरची कार्यवाही ही दिनांक 27/05/2021 चे 11:00 वा. ते दिनांक 28/04/2021 रोजी 17:00 वा. दरम्याण करण्यात आली आहे.माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष (अविनाश भामरे) पोलीस उप अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Roshan Raghunath Yadav(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

D.D. Sontakke 28.5.21

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Roshan Raghunath Yadav

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)